दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २०१ •सोमवार, दि.२० ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



# नगरपालिका निवडणुका डिसेंबरमध्ये ?



**मुंबई । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. त्यानुसार नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा केली जाणार आहे. त्यातही राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या निवडणुका डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. महापालिका, नगरपलिका व नगरपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती अशा त्रिस्तरीय निवडणुका घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. या संदर्भात राज्य सरकार व जिल्हा प्रशासनाबरोबर निवडणूक आयोगाने तयारीचा आढावा घेतला. पहिल्या टप्प्यात राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या निवडणुका होतील. या निवडणुका नोव्हेंबरअखेर घेण्याची योजना होती. परंतु त्या बहुधा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होतील, असे निवडणूक आयोगाने सूचित केले.

डिसेंबरअखेरीस राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायतींच्या निवडणुका होतील. अखेरच्या टप्प्यात १५ ते २० जानेवारी दरम्यान २९ महापालिकांच्या निवडणुका होतील. जानेवारीअखेर सर्व निवडणुकांची प्रक्रिया पार पाडण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे... यानुसार २० जानेवारीपूर्वी सर्व प्रक्रिया पार पाडण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा प्रयत्न आहे.

– त्रिस्तरीय निवडणुकीत जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका सर्वात आधी होतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागात शेतीचे अतोनात नुकसान झाले. हातचे पीक गेल्याने शेतकरी वर्ग नाराज आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुका लगेचच घेतल्यास त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

▶▶ उर्वरित पान २ वर

### 'मविआ'च्या मागणीला केराची टोपली ?

**सदोष मतदारयाद्यांवरून महाविकास आघाडी (मविआ) आणि मनसेने राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. मतदारयाद्यांमधील घोळ मिटल्यावरच निवडणुका घेण्याची मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, बाळासाहेब थोरात आदींनी केली. सदोष मतदार याद्यांच्या आधारे निवडणुका घेण्यापेक्षा त्या काही काळ पुढे ढकलाव्यात, अशी मागणी 'मविआ'ने केली. परंतु राज्य निवडणूक आयोग निवडणुकांच्या दृष्टीने सारी पावले टाकत आहे. या महिनाअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाईल.**

## केंद्रीय कृषीमंत्री शेतकऱ्यांना संबोधित करणार!

**०७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन; अनेक मान्यवरांची उपस्थिती**



**परळी वै. । प्रतिनिधी**

०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, माराठवाड्यातील शेतकरी बांधवांना केंद्रीय कृषीमंत्री संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमास ▶▶ उर्वरित पान २

## या शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार, शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत पात्र असूनही अनेक वर्षांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय आला आहे. औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला सहा आठवड्यांमध्ये या थकीत शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या आदेशामुळे गेल्या अनेक वर्षांपासून अडकलेल्या कर्जमाफीच्या प्रक्रियेला गती मिळणार असून, न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत सुमारे ४४ लाख



शेतकऱ्यांचे दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात आले होते. मात्र, विविध कारणांमुळे ६ लाख ५८ हजारहून अधिक शेतकरी या लाभापासून वंचित राहिले होते. या वंचित शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मंजुरी दिली होती आणि यासाठी आवश्यक असलेला सुमारे ६,००० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची घोषणा केली होती. परंतु, २०२२ नंतर तीन वर्षे उलटूनही ही कर्जमाफी प्रत्यक्षात आली नव्हती.

या दिरंगाईमुळे भाऊसाहेब पारके यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. कोर्टाचे आदेश येऊनही कर्जमाफी न झाल्याने नंतर न्यायालयाच्या अवमानाची याचिका दाखल करण्यात आली. याच याचिकेवर न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी आणि वैशाली जाधव यांनी निर्णय देत, शासनाला सहा आठवड्यांत कर्जमाफीचा आदेश दिला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## सोमवार आणि मंगळवारी धनंजय मुंडे घेणार परळी नगर परिषदेतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**सोमवारी वॉर्ड क्र. १ ते ८ तर उर्वरित वॉर्डातील इच्छुकांच्या मुलाखती मंगळवारी**

**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून, परळी वैजनाथ येथील नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लढण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस मुलाखती घेणार आहेत. सोमवारी (ता.२०) सकाळी अकरा



वाजल्यापासून सायंकाळी पाच

▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादाने नवी उभारी घेऊ : धनंजय मुंडे

- बोधेगाव येथील जिल्हा परिषद शाळा, जलजीवन मिशन, हनुमान मंदिर सभागृह यांसह विविध विकास कामांचे धनंजय मुंडेंच्या हस्ते लोकार्पण
- माऊली गडदेंनी धनंजय मुंडेंच्या तब्येतीची काळजी व्यक्त करताच गावकरी भावूक

**परळी वै. । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यात एका दुर्दैवी घटनेच्या आडून काहींनी मला टार्गेट केले, या काळात माझा काहीही संबंध नसताना माझी अनेक दिवस मीडिया ट्रायल घडवून आणली गेली. मात्र या पूर्ण काळात माझ्या परळीतील सर्वसामान्य जनता संपूर्ण ताकत आणि आशीर्वादाने माझ्या पाठीशी राहिली. मी अनेक दिवस गप्प राहिलो, दोन वेळा मरता मरता वाचलो तेही याच आशीर्वादाच्या बळावर! माझी माय बाप जनता



जे आशीर्वाद माझ्या पाठीशी उभे करून ठाम उभी आहे, त्या बळावर आपण पुन्हा नवी उभारी घेऊ, असे प्रतिपादन माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज परळी तालुक्यातील बोधेगाव ▶▶ उर्वरित पान २ वर

## ऊसाऐवजी केळीची शेती करून 27 लाखांचे उत्पन्न;अरणवाडीच्या केळीचा परदेशी प्रवास

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील अरणवाडी येथील प्रगतशील शेतकरी दादासाहेब फुटाणे यांनी आधुनिक शेतीचा अवलंब करून केळी पिकातून तब्बल १५० टन उत्पादन घेतले असून, त्यातून त्यांना २७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. हा यशस्वी प्रयोग शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, आधुनिक शेती आणि योग्य बाजारपेठेच्या



जोरावर ग्रामीण भागातील आर्थिक प्रगतीचा मार्ग दाखवणारा आहे. धारूर तालुक्यातील अरणवाडी परिसरात पाणी मुबलक असल्याने तो परिसर सधन मानला जातो.

## राज्यातील एका सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकोची महिन्याची कमाई ऐकून थक्क व्हाल

**महिन्याला तब्बल ८५ लाखांची कमाई करून ईडीलाही चकित केलं!**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील एका सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकोच्या महिन्याची कमाई ऐकून थक्क व्हाल. थोडी तिकड़ी नाही तर महिन्याला ८५ लाख रुपये ही सरकारी अधिकाऱ्याची बायको कमवते. आम्ही ज्या अधिकाऱ्याबद्दल बोलतोय, त्या अधिकाऱ्याचं नाव आहे अनिल कुमार पवार. माजी आयुक्त अनिल कुमार पवार यांना सध्या मुंबई उच्च न्यायालय आणि सुप्रीम कोर्टाने अटक बेकायदेशीर असल्याचं सांगितलं असलं तरी, त्यांच्या बायकोची महिन्याची कमाई सध्या चर्चेचा विषय



बनलेली आहे. फोटोत दिसणाऱ्या आहेत भारती अनिलकुमार पवार, म्हणजे माजी आयुक्त अनिल कुमार पवार यांची पत्नी. मागील दोन महिन्यांपासून अनिल कुमार पवार यांची रवानगी ईडीच्या तुरुंगात होती. अनिल कुमार पवार यांच्यासह त्यांची पत्नी भारती पवार यांच्यावर मनी लॅंडिंगचा गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. परंतु भारती पवार यांना अटक करण्यात आली नव्हती. १३ ऑगस्ट रोजी अनिल कुमार पवार यांना अटक करण्यात आली होती. अनिल कुमार पवार यांना दोन दिवसांपूर्वी हाय कोर्ट आणि सुप्रीम कोर्टाने दिलासा देत ही अटक बेकायदेशीर असल्याचं सांगितलं आहे. परंतु ज्या वेळेला अनिल कुमार पवार यांना अटक झाली, त्याच वेळेला भारती पवार यांची देखील एऊ कडून स्टेटमेंट रेकॉर्ड केली गेली. भारती पवार

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी मोठं पाऊल, कृषिमंत्री दत्ता भरणे यांची घोषणा



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई: राज्यातील सेंद्रीय प्रमाणित आणि नैसर्गिक शेती उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी राज्य शासन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहे. केंद्र शासन प्रमाणित संस्थाकडून राज्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेंद्रीय प्रमाणपत्रांची तपासणी ▶▶ उर्वरित पान २ वर

**गैरव्यवहार आढळल्यास प्रमाणिकरण संस्थांचा अहवाल केंद्र शासनाला पाठवणार असल्याचे सांगून कृषि विभाग फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.**

## १९३००५०० रुपयांचं सोनं, पैसे मोजून अधिकाऱ्यांनाही फुटला घाम, मशीनं तापले पण नोटा संपेना, कुठे सापडलं घबाड

**वृत्तसंस्था**

अधिकाऱ्यांना नोटा पाहूनच घाम फुटला, मोजपर्यंत मशीन गरम झाल्या, तरी नोटा काही केल्या संपेना, इतका ऐवज पाहून कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे डोळेच विस्फारले होते. एक एक बॅग





उघडल्यानंतर त्यातून कपडे नाही तर ५०० रुपयांच्या पैशांचं बंडल सापडत होते. एक दोन नाही अशा अनेक बॅगा कर्मचाऱ्यांना उघडून समोर ठेवल्या. ते पाहूनच घाम फुटला, इतकी रक्कम मोजणं मोठा टास्कच होता. नोटा मोजून मशीन गरम झालं, तर दागिन्यांच्या किंमतीची टॅली करता करता बोबडी वळायची वेळ आली. केंद्रीय तपास यंत्रणा ने पंजाब पोलिसांच्या रोपड रेंजचे डीआयजी हरचरण सिंह भुल्लर यांना लाचखोरीच्या एका प्रकरणात

▶▶ उर्वरित पान २ वर












# ... तोपर्यंत महाराष्ट्रात निवडणुका घेऊनच दाखवा,

## राज ठाकरेंचा थेट निवडणूक आयोगाला इशारा; घातली अट!

मुंबईमधील गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे आज (१९ ऑक्टोबर) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मेळावा पार पडला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी मनसैनिकांना काही महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. तसेच यावेळी बोलताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.

'तसेच महाराष्ट्रातील मतदार यादी जोपर्यंत स्वच्छ होत नाही, तोपर्यंत तुम्ही महाराष्ट्रात निवडणुका घेऊनच दाखवा', असा इशाराच राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला दिला आहे. तसेच मतदार यादीतील त्रुटी निवडणूक आयोगाने दूर करण्याचं आवाहनही राज ठाकरे यांनी दिलं आहे. दरम्यान, राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या इशाऱ्यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा राजकारण तापण्याची शक्यता आहे.माझ्या महाराष्ट्रातील सर्व मतदारांना माझी विनंती हे की सतर्क राहा. मी आज सर्व यादी प्रमुखांना बोलवलं आहे. सर्व गोष्टी टप्प्या-टप्प्याने होणार. तुम्ही घरा-घरांमध्ये जा आणि याद्या तपासा. आमचे लोक जेव्हा येतील किंवा सहकारी पक्षाचे लोक जेव्हा तुमच्याकडे येतील तेव्हा नागरिकांनी सहकार्य करा. एकएका घरांमध्ये आठशे-आठशे लोक भरले जात आहेत. सातशे माणसं, आठशे माणसं, एक हजार माणसं, जे मतदार नाहीत, पण अशी सर्व खोटे मतदार भरून। हे निवडणुकांना समोरं जायचं म्हणत आहेत. पण जोपर्यंत ही निवडणूक यादी स्वच्छ होत नाही, सर्व राजकीय पक्षांचं समाधान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत तुम्ही या महाराष्ट्रात निवडणुका घेऊनच दाखवा, असा इशारा राज ठाकरेंनी दिला.




महाराष्ट्रातील निवडणुका शांततेत पार पाडायच्या असतील तर पहिली ती मतदार यादी स्वच्छ करा. जो मतदार आहे, त्याचा आदर करा. जो खरा मतदार आहे, त्याला मतदान करू द्या. कोण सत्तेत येईल आणि कोण पराभूत होईल याच्याशी मला देणंघेणं नाही. पण जे मतदान होईल ते खरं होईल. या अनुषंगाने निवडणुका झाल्या पाहिजेत.

आत्ताही विधानसभेची निवडणूक झाली २३२ आमदार निवडून आले आहेत. एवढं प्रचंड यश मिळूनही महाराष्ट्रात सन्नाटा होता. मतदार तर आवाक झालेच होते पण निवडून आलेलेही आवाक झाले होते. कारण त्यांनाही कळलं नाही कसा निवडून आलो. मग सगळ्यांनाच समजलं की निवडणुका कशा प्रकारे चालल्या आहेत. कसे विजय मिळतात, कसं यश मिळतं ते कळलं, असं राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरेंच्या सभांना गर्दी होते पण मतांमध्ये रुपांतर होत नाहीत असं अनेक जण म्हणतात. असं केलं तर कशी काय मिळेल मतं? मला तर कळलं आहे की आत्ताच्या निवडणुकांसाठी १ जुलैला निवडणुकांसाठी यादी बंद केली आहे. जवळपास ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले आहेत. मुंबईत ८ ते साडेआठ लाख मतदार, ठाण्यात, पुण्यात अशा प्रत्येक ठिकाणी भरले आहेत. अशा निवडणुका होणार आहेत तर मग प्रचार कशाला करायचा? असा सवाल राज ठाकरेंनी केला आहे. तुम्ही मतं द्या किंवा नका देऊ मॅच फिक्स झाली आहे. अशा प्रकारे निवडणुका होणार का? ही कोणती लोकशाही आहे? असंही राज ठाकरे यांनी म्हटलं.

# दिवाळीचा प्रकाश आणि शेतकऱ्यांच्या अंधारात हरवलेलं महाराष्ट्र

दिवाळीचा सण - प्रकाश, आनंद, उत्साह आणि ऐक्याचं प्रतीक. पण महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांच्या घरात आजही अंधार आहे. या वर्षी राज्याच्या अनेक भागांमध्ये ओल्या दुष्काळाने थैमान घातलं आहे. पिकांचं नुकसान, कर्जाचा बोजा आणि आशेचा तुटलेला दोरा - या सगळ्यांच्या छायेत साजरी होणारी दिवाळी शेतकऱ्यांसाठी सण नव्हे, तर आणखी एक आर्थिक आणि मानसिक कसोटी ठरते आहे.

### ● हवामानाचा विस्कटलेला ताल

▶ अलीकडच्या काही वर्षांत हवामानाने आपला ताळमेळ गमावला आहे. जून-जुलैमध्ये पावसाने तोंड दाखवले नाही, तर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये अचानक अतिवृष्टीमुळे शेती पाण्याखाली जाते. या वर्षीही तसंच झालं. मराठवाडा, विदर्भ, नाशिक, सोलापूर आणि सांगली या भागांमध्ये ओल्या दुष्काळाने कहर केला. सोयाबीन, कापूस, भात, द्राक्षं आणि कांदा या पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं.

▶ ओला दुष्काळ - म्हणजे पाऊस असतो, पण तो शेतकऱ्याला उपयोगी ठरत नाही. पिकं पावसामुळे सडतात, जमीन ओलसर राहून रोगराई वाढते, आणि उत्पादन घटतं. परिणामी शेतकऱ्याचं आयुष्य पुन्हा एकदा संकटात सापडतं.



### ● संकटात सापडलेला शेतकरी

▶ महाराष्ट्रातील शेतकरी आज केवळ हवामानाशीच नव्हे, तर आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेशीही लढतो आहे.

▶ पिकं गेल्यानंतर त्याच्याकडे बाजारात विकायला काहीच उरत नाही.

▶ कर्जाचा हप्ता थकतो, व्याज वाढतं, आणि बँकेच्या नोटिशा घरपोच येतात.

▶ विमा योजनांचे दावे प्रलंबित राहतात, तर सरकारी मदत अनेकदा फक्त कागदांवरच दिसते.

▶ या सगळ्यात शेतकऱ्याचं मनोबल खचतं. आत्महत्यांचे आकडे वाढतात, आणि समाज केवळ आकडेवारीवर चर्चा करतो - उपायावर नाही.

### ● दिवाळी - शेतकऱ्याच्या घरातला नीरव प्रकाश

▶ दिवाळी म्हणजे आशेचा उत्सव. पण शेतकरी कुटुंबासाठी ती आशा प्रत्येक वर्षी अधिकच फिकट होत चालली आहे.

▶ कधी घरातील एकच दिवा पेटतो - तोही वीज नसल्यामुळे नव्हे, तर आर्थिक अडचणींमुळे. मुलांना नवीन कपडे देणे, मिठाई बनवणे, पाहुण्यांचे स्वागत करणे - हे सर्व त्याच्यासाठी आता स्वप्नासारखं झालं आहे.

▶ शहरांमध्ये रोषणाईचा उत्सव सुरू असताना गावांमध्ये मात्र एक शेतकरी आपल्या सडलेल्या पिकांकडे पाहत दिवाळीची रात्र घालवतो. ही वेदना केवळ भावनिक नाही, तर ती महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक आरोग्याची गंभीर इशारा आहे.

### ● मदत आणि वास्तव

▶ राज्य व केंद्र सरकारकडून वारंवार मदतीच्या घोषणा केल्या जातात. पण त्या प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हाती किती पोहोचतात, हा प्रश्न कायम आहे. विमा दावे महिनोन्महिने प्रलंबित राहतात. काही वेळा शेतकऱ्याला केवळ काहीशे रुपयांचा चेक मिळतो, जो त्याच्या झालेल्या लाखो रुपयांच्या नुकसानीपुढे नगण्य ठरतो.

▶ वास्तव हे आहे की, जोपर्यंत शेतीला उद्योगाच्या दर्जाने वागणूक दिली जात नाही, तोपर्यंत शेतकऱ्याची दिवाळी केवळ प्रतीकात्मक राहील.

### ● पुढचा मार्ग - बदलाची गरज

▶ राज्याने दीर्घकालीन उपाययोजनांकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

▶ पाणी साठवण, ड्रिप सिंचन, बंधारे बांधणी आणि जलसंधारण यावर ठोस पावले उचलली पाहिजेत.

▶ शेतकऱ्यांना हवामान-आधारित सल्ला आणि तंत्रज्ञानाची माहिती वेळेवर मिळावी.

▶ कर्जमाफीपेक्षा कर्जमुक्तीचा मार्ग - म्हणजेच स्थिर उत्पन्न आणि योग्य बाजारभाव - यावर भर दिला पाहिजे.

▶ शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे.

● दिवाळीचा खरा अर्थ आहे - अंधारावर प्रकाशाचा विजय. पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात अजूनही अंधार कायम आहे. हा प्रकाश फक्त फटाके आणि रोषणाईतून नाही, तर न्याय्य धोरणांमधून, संवेदनशील प्रशासनातून आणि समाजाच्या एकत्र प्रयत्नांतून यावा लागेल. शेतकरी आनंदी असेल, तर दिवाळीचा उजेड खऱ्या अर्थाने महाराष्ट्रभर पसरू शकेल. तोपर्यंत - या दिवाळीत आपण दिवा लावताना एका शेतकऱ्याच्या घरातील अंधारही लक्षात ठेवला पाहिजे.

संकलन- लेखन
-शबनम मुजीब खान
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

◆ पान 9 वरून पुढे...

## नगरपालिका निवडणुका...

-भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आदींना शेतकरी वर्गाची नाराजी परवडणारी नाही. शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर करण्यात आली असली तरी शेतकऱ्यांच्या हाती ही मदत मिळण्यास काहीसा विलंब लागत आहे. यामुळे जिल्हा परिषदा निवडणुका डिसेंबर अखेर घेतल्यास त्याचा तेवढा परिणाम जाणवणार नाही, असे महायुतीचे गणित आहे. मतदारयाद्यांमधील घोळाबाबत महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम व राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत निवडणूक आयोगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला आहे. 'ही प्रचलित पद्धत आहे. तक्रारी आल्यावर संबंधित जिल्हाधिकारी किंवा निवडणूक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला जातो,' असे निवडणूक आयोगाच्या वरिष्ठांकडून सांगण्यात आले.

## केंद्रीय कृषीमंत्री....

अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचेही संयोजकांच्या वतीने कळवण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्याच्या पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## या शेतकऱ्यांची...

या कर्जमाफीसाठी सरकारला ५,८०० ते ६,००० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असणार आहे. पूर्वी थकीत कर्जदारांचा डाटा रिकव्हर न झाल्याचे कारण सांगून कर्जमाफीची प्रक्रिया बारगळली होती. आता न्यायालयाच्या आदेशामुळे, प्रलंबित असलेल्या या ६ लाख ५८ हजार शेतकऱ्यांची कर्जमाफी लवकरच पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

◆ पान 9 वरून पुढे...

## सोमवार आणि....

वाजेपर्यंत वॉर्ड क्रमांक एक ते आठ मधील इच्छुक उमेदवारांच्या तर उर्वरित वॉर्डातील इच्छुकांच्या मंगळवारी अकरा ते पाच या वेळेत मुलाखती घेणार आहेत. या सर्व मुलाखती परळी शहरातील नवीन विशेष शासकीय विश्रामगृह या ठिकाणी होणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित राहतील. दरम्यान मागील बऱ्याच वर्षांपासून ही नगर परिषद एकहाती धनंजय मुंडे यांच्या ताब्यात राहिलेली असून, गेल्या जवळपास चार वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत.

## राज्यातील एका...

यांना जवळपास पाच वेळा बोलावून चौकशी करण्यात आली आहे. आणि त्या चौकशीत त्यांनी महिन्याच्या कमाईचं गणित मांडलं आहे.

चौकशीत भारती पवार यांनी कबूल केले की, तपासापूर्वी त्यांनी २-३ दिवसांत मोबाईलवरील थर्र्ीि चॅट्स आणि फोटो डिलीट केले. तसेच अनेक संस्थांच्या बँक खात्यांवरील रिकामे चेक्स आपल्या भावाला दिले असल्याचंही मान्य केलं. पवार यांनी कबूल केलं की, त्यांना रिअल इस्टेट किंवा बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान नाही, तरीदेखील त्या फर्ममधून महिन्याला कोट्यवधींचं उत्पन्न मिळतं.

## शेतकऱ्यांची फसवणूक...

करण्यात येणार असून या तपासणीमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळल्यास अशा संस्थांचा अहवाल केंद्र शासनाला पाठवणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

मंत्रालय येथे सेंद्रिय प्रमाणीकरण संस्था संदर्भात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीला माजी आमदार विजय भांबळे, माजी आमदार राहुल मोटे, 'आत्मा'चे संचालक सुनिल बोरकर, उपसचिव संतोष कराड, दूरदृश्यप्रणालीद्वारे ग्रीनसर्ट बायोसोल्युशन प्रा.लि. पुणेचे प्रतिनिधी सुनिल केसरे, ब्युरो व्हेरीटस प्रायव्हेट लिमिटेडच्या सुचिता यादव, वनसर्ट इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड जयपूरचे आशिष दळवी यावेळी उपस्थित होते.

## १९३००५०० रुपयांचं...

गुरुवारी अटक केली. त्यांच्या घरावरील छापेमारी दरम्यान पाच कोटींची रक्कम दीड किलो सोनं आणि महागडी घड्याळं यासोबत अनेक ऐवज जप्त करण्यात आला. फत्तेहगढ साहिब येथील मंडी गोबिंदगढ येथील एका भंगार व्यावसायिकाकडून डीआयजी भुल्लर यांनी एका दलालामार्फत ८ लाख रुपयांची लाच मागितल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. २०१७ बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डीआयजी भुल्लर यांचे वडील महल सिंह भुल्लर हे देखील पंजाबचे डीजीपी राहिलेले आहेत.

सीबीआयने सापळा रचून डीआयजी हरचरण सिंह भुल्लर यांना चंदीगडच्या सेक्टर-२१ मधून ८ लाख रुपये लाच घेताना रंगेहाथ पकडले. या कारवाईत डीआयजी भुल्लर यांच्यासोबत दलाल कृष्णू यालाही अटक करण्यात आली आहे. या भंगार व्यावसायिकावर दाखल असलेल्या एफआयआरवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी डीआयजी भुल्लर हे दलाल कृष्णूकरवी दर महिन्याला 'मंथली' वसुली करायचे.

◆ पान 9 वरून पुढे...

## परळी मतदारसंघातील...

येथील कार्यक्रमात बोलताना केले. बोधेगाव येथे नाथ प्रतिष्ठान व जिल्हा परिषद बीड यांच्या एकत्रित निधीतून उभारण्यात आलेल्या सुमारे ७७ लक्ष रुपयांच्या जिल्हा परिषद ईमारतीचे उद्घाटन, तसेच सुमारे ७५ लाख रुपयांच्या जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण, हनुमान मंदिर येथील सभागृहाचे लोकार्पण, यांसह बोधेगाव येथील विविध विकास कामांचे लोकार्पण धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात धनंजय मुंडे बोलत होते. विकास हा आपला पिंड आहे, आज परळी शहराला जोडणारे सर्वच्या सर्व रस्ते चकाचक होत आहेत, ग्रामीण भागातही रस्त्यांसह साठवण तलावांची कामे हाती घेत आहोत, नागपिंपरी येथील सब स्टेशनचे कामही लवकरच सुरू होईल. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांसह आगामी काळात जुन्या थर्मलच्या जागेत उभारण्यात येणाऱ्या मेगा सोलर प्रकल्पाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात या भागात रोजगार निर्मिती ही होणार असल्याचे यावेळी पुढे बोलताना श्री मुंडे म्हणाले. बोधेगाव येथील पुलासह ग्रामस्थांनी केलेल्या विविध मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्या सर्व मागण्या आगामी काळात मान्य केल्या जातील असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी माजी आमदार संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा परिषद अध्यक्ष राजेश्वर चव्हाण, यांसह मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. दरम्यान बोधेगाव चे सुपुत्र तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक माऊली तात्या गडदे यांनी आपल्या भाषणादरम्यान धनंजय मुंडे यांची तब्येत गेल्या काही दिवसात खराब

◆ पान ४ वरून पुढे...

असून, कार्यकर्ते आणि गावचे लोक म्हणून जेव्हा धनंजय मुंडे यांच्यावर खोटे आरोप होत होते तेव्हा ते बघून आम्हाला अत्यंत वाईट वाटायचे, अजूनही धनंजय मुंडे यांची तब्येत व्यवस्थित नाही आणि ईश्वराकडे आपण सर्वजण मिळून त्यांची तब्येत बरी होण्यासाठी प्रार्थना करू असे बोलताना माऊली यांच्यासह सर्वच ग्रामस्थ भाऊ झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, शिवाजीराव शिरसाट, बोधेगावच्या सरपंच सुरेखाताई गडदे, बाळासाहेब दोडतले, सूर्यभान मुंडे, वैजनाथराव सोळंके, विष्णुपंत सोळंके, ह भ प आचार्य लक्ष्मण महाराज, श्रीहरी मुंडे, मधुकर आघाव, मोहनराव सोळंके, पिंटू मुंडे, विष्णुपंत देशमुख, बाबासाहेब काळे, बालासाहेब शेप, दत्तात्रय गुट्टे, राजाभाऊ पोळ, शिवदास बिडगर, चंद्रकांत कराड, विकास बिडगर, माऊली मुंडे, कमलाकर बिडगर, जानीमिया कुरेशी, रुस्तुम राव सलगर, लक्ष्मण करणर, सतीश शिरसाठ, अशोक डिगोळे, यशवंत भोसले, संदीप देशमुख, प्रकाश कावळे, विश्वनाथ जानकर, विठ्ठल कोकरे, वसंतराव देशमुख, आयुब भाई शेख, भागवत मुंडे, राजाभाऊ शेप, कांता फड, अरुण मुंडे, सुधीर शिंदे यांसह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

**दरम्यान सप्टेंबर - ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या मदतीपोटी राज्य सरकारने बीड जिल्ह्यात ५७७ कोटी रुपयांची आर्थिक मदत केली असून, त्याचे वितरण सध्या प्रशासनाकडून सुरू आहे. दिवाळीत हे मदतीचे पैसे सामान्य शेतकरी बांधवांना मिळावेत यासाठी शनिवारी रविवारी देखील बँका सुरू ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या असून त्याप्रमाणे सध्या कार्य सुरू असून, कुठल्याही शेतकऱ्यांच्या खात्यावर कोणत्याही प्रकारचा होल्ड लावण्यात येऊ नये अशा ही सूचना दिल्या असल्याचे व त्याप्रमाणे कार्यवाही सुरू असल्याचे धनंजय मुंडे यांनी नमूद केले.**

## नाम फाउंडेशन....

आले यावेळी ॲड देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले बियाणे पेरून चांगल्या प्रकारचे उत्पादन घ्यावे आणि नामचा उद्देश साध्य करावा, असे त्यांनी यावेळी म्हटले. तुषार पाटील यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. गावातील जवळपास दोनशे शेतकरी त्याचबरोबर उपसरपंच देखील यावेळी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ३०० चित्रपट करणारा सुपरस्टार; पत्नीच्या निधनाने तुटला, अखेर कामवालीच्या नावावर संपत्ती करून संपवलं आयुष्य

**मुंबई । प्रतिनिधी**

सिनेमाच्या पडद्यावर आनंद आणि रोमान्सचे जग दाखवणारा प्रत्येक कलाकार त्याच्या खासगी आयुष्यातही तितकाच सुखी असेलच असे नाही. अनेक सुपरस्टार्स असे आहेत, जे आपल्या वैयक्तिक आयुष्यातील दुःख मनात दडवून चेहऱ्यावर खोटे हसू घेऊन पडद्यावर उतरतात आणि प्रेक्षकांना त्यांच्या खऱ्या वेदनांची जराही कल्पना येऊ देत नाहीत. अमाप संपत्ती आणि कीर्ती कमावल्यानंतरही अनेक कलाकारांच्या आयुष्याचा अंत अत्यंत धक्कादायक वळणावर झाला आहे. काहींना तर जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात कंगाल अवस्थेत जगावे लागले. याच यादीतील एक नाव म्हणजे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते रंगनाथ यांचे, ज्यांची कहाणी तुम्हाला विचार करायला लावेल.

सुपरस्टार अभिनेत्याचा धक्कादायक अंत- तिरुमला सुंदर श्री रंगनाथ हे मूळ नाव असलेल्या रंगनाथ यांनी १९७० च्या दशकात तेलुगु चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यांनी चित्रपटांमध्ये 'कॅरेक्टर रोल' साकारून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. 'गोपाल-गोपाल', 'देवराय', 'अडवी रामुडु' आणि 'निजाम' यांसारख्या ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी उत्कृष्ट काम केले. तेलुगु सोबतच तमिळ, कन्नड आणि हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका



केल्या.

पत्नीच्या सेवेत १५ वर्षे- रंगनाथ यांचे वैवाहिक जीवन सामान्य होते. त्यांना दोन मुली आहेत. मात्र, त्यांच्या आयुष्यात सर्वात मोठा आघात झाला, जेव्हा त्यांच्या पत्नीला दीर्घकाळ आजारपणामुळे अंथरुणावर पडून राहावे लागले. रंगनाथ यांनी तब्बल १५ वर्षांपर्यंत आजारी असलेल्या आपल्या पत्नीची मनापासून सेवा केली. मात्र, २००९ मध्ये पत्नीच्या निधनानंतर रंगनाथ पूर्णपणे कोलमडून गेले. पत्नीचे जाणे त्यांच्यासाठी खूप मोठा धक्का होता, ज्यातून ते कधीच सावरू शकले नाहीत.

कामवालीला दिली संपत्ती आणि रोख रक्कम-आयुष्याच्या अखेरच्या दिवसांमध्ये रंगनाथ यांची आर्थिक परिस्थिती खूपच बिकट झाली होती. त्यांना हैदराबादमधील केवळ ५,००० रुपये भाड्याच्या घरात राहावे लागले. याच काळात त्यांची कामवाली मीनाक्षी हिने त्यांच्या आजारपणात खूप काळजी घेतली आणि त्यांची सेवा केली. या कठीण काळात मीनाक्षीने केलेल्या मदतीमुळे रंगनाथ खूप प्रभावित झाले होते. अखेरीस, एका दुपारी रंगनाथ यांनी गळफास लावून आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येच्या घटनेने साऱ्या सिनेसृष्टीला धक्का बसला. रंगनाथ यांनी आपल्या 'सुसाइड नोट'मध्ये स्पष्टपणे लिहिले होते.

## परळी ते मुंबई अमृत भारत एक्स्प्रेस, लातूर एक्स्प्रेसला परळी मार्गे नांदेड पर्यंत वाढ, परळी ते नाशिक ज्योतिर्लिंग दर्शन विशेष रेल्वेगाडी सुरू करण्याची धनंजय मुंडे यांची रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

### सण, उत्सवांच्या काळात विशेष गाड्या तसेच भाविकांच्या सोयीसाठी विविध उपक्रम राबविण्याची पत्राद्वारे विनंती

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ ते मुंबई विशेष अमृत भारत एक्सप्रेस गाडी सुरू करावी तसेच लातूर ते मुंबई जाणाऱ्या लातूर एक्सप्रेसचा आठवड्यातून किमान चार दिवस परळी मार्गे नांदेड पर्यंत पल्ला वाढविण्यात यावा, परळी वैद्यनाथ ते नाशिक विशेष ज्योतिर्लिंग एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी यांसह विविध मागण्या माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केल्या आहेत.

परळी रेल्वे स्थानकावर भाविकांना माहिती देण्यासाठी विशेष माहिती केंद्र सुरू करावे त्याचबरोबर नांदेड पनवेल एक्सप्रेस गाडीला फर्स्ट क्लास एसी चे डबे वाढवून द्यावेत, परळी रेल्वे स्थानकावर पीपीटी लाईनला मंजुरी देण्यात यावी यांसह विविध मागण्या या पत्राद्वारे धनंजय मुंडे यांनी केल्या आहेत. परळी वैजनाथ हे रेल्वे विभागाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवून देणारे रेल्वे स्थानक असून पुणे आणि मुंबईसाठी नियमित ये-जा करणारे अनेक प्रवासी, तसेच वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी येणारे व जाणारे लाखो भाविक परळी रेल्वे स्थानकातून प्रवास करतात. मात्र परळी वरून थेट मुंबईला जाण्यासाठी रेल्वे गाडी उपलब्ध नसल्याने ही मागणी करण्यात आल्याची समजते. त्याचबरोबर परळी वैद्यनाथ येथून नाशिककडे जाताना औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांना जोडणारी ज्योतिर्लिंग एक्सप्रेस ही विशेष गाडी सुरू करण्याची ही मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे. गणेशोत्सव दिवाळी त्याचबरोबर महाशिवरात्री अशा विविध क्षणोत्सवांच्या काळामध्ये विशेष फेस्टिवल एक्सप्रेस देखील सुरू करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# 'महाज्योती'च्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करु : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आज आकारास आले आहे. येत्या काळात ही प्रशासकीय इमारत आधुनिक आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त ठरणार आहे. आपण इतर मागासवर्ग विभागाची स्थापना केल्यामुळे गती मिळाली. या विभागाच्या माध्यमातून होतकरू नवीन पिढी आकारास येईल तसेच त्यांच्या स्वप्नांना बळ मिळून गगनभरारी घेता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी व्यक्त केला. सदर येथील जिल्हा नियोजन भवन आवारात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, ओबीसी समाजाला पुढे नेण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. यात प्रशिक्षण, स्वयंरोजगार यांचा समावेश आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून राज्यातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा

**मुंबई । प्रतिनिधी**

दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि ऐक्याचा सण आहे. हा सण प्रत्येकाच्या जीवनात नव्या आशा, नव्या संधी आणि समाधानाचा प्रकाश घेऊन येवो, अशा सदिच्छा व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, यंदा राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पूरस्थितीमुळे अनेक



शेतकऱ्यांचे, शेतीचे तसेच पशुधनाचे अतोनात नुकसान झाले आहे. या संकट काळात आपल्या शेतकरी व पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यांचे जीवन पुन्हा उजळविण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करुया. अतिवृष्टी व पूरबाधित बांधवांना मदत करून त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेण्याची महाराष्ट्राची सामाजिक परंपरा कायम राखूया. दिवाळी म्हणजे फक्त दिव्यांचा उजेड नव्हे, तर मनातील अंधार दूर करण्याचा संकल्प आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय आणि अनिष्ट रुढी-प्रथांचा अंधार दूर करून विवेक, ज्ञान आणि प्रगतीचा प्रकाश आपल्या जीवनात आणूया. सामाजिक ऐक्य, बंधुता आणि सौहार्द यांची भावना दृढ करण्याचा हा सण आहे. राज्यातील सर्व नागरिकांनी प्रगती, विकास आणि सहकार्याच्या वाटेवर एकत्र चालावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. दिवाळीच्या या प्रकाशासोबत आपल्या राज्यात शांतता, स्थैर्य आणि समृद्धीचा नवा अध्याय सुरु व्हावा, अशा सदिच्छा व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व जनतेला दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एस.एस.बी. (SSB) कोर्स क्र. ६३ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे ईमेल (training.petenashikgmail.com), दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सॲप नंबर ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

# नूतन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सोडवला अखेर कलावंतांचा प्रश्न; दिवाळीपूर्वी दिली कलावंतांना भेट

### राजर्षी शाहू महाराज मानधन सन्मान योजनेसाठी परभणी जिल्ह्यातील ३५ कलावंतांची निवड

**परभणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना २०२४-२५ अंतर्गत जिल्हा परिषद, परभणी मार्फत साहित्यिक व कलावंतांची निवड प्रक्रिया खूप दिवसापासून विविध कारणामुळे रखडली होती. यामध्ये वैयक्तिक लक्ष घालून नव्यानेच रुजू झालेले जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत निवड समिती यांनी एकाच दिवसात सर्व कलावंतांच्या मुलाखती, सादरीकरण प्रक्रिया घेऊन त्याच दिवशी सायंकाळी कलावंतांच्या निवडीचा निकालही घोषित केला. एक प्रकारे जिल्हाधिकारी महोदयांनी सर्व साहित्यिक व कलावंतांना दिवाळीची भेट देऊन संवेदनशीलता दाखवल्यामुळे



सर्वत्र कौतुक होत आहे.

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना अंतर्गत सन २०२४-२५ साठी गुरुवारी (दि. १६) जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये जिल्हास्तरीय निवड समितीच्या या बैठकीत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी समाज कल्याण अधिकारी श्रीमती भोजने, महिला व बालकल्याण अधिकारी श्रीमती काळम, अशासकीय सदस्य म्हणून काशिनाथ उबाळे, शिवाजी सुक्ते, अनंत गोलाईत, संदीप राठोड हे सुद्धा मूल्यमापन समितीमध्ये होते.

दिवसभरात ८१ कलावंताचे सादरीकरण पूर्णवेळ जिल्हाधिकारी महोदयांनी घेतले आणि त्याच दिवशी सायंकाळीच विविध क्षेत्रातील ३५ कलावंतांची निवड करून यादी घोषित केली. सादरीकरणावेळी जिल्हाधिकारी महोदयांचे साहित्य व कला क्षेत्रातील प्रघाड ज्ञान पाहून अशासकीय सदस्यांनी सुद्धा आश्चर्य व्यक्त केले.

कागदपत्र पडताळणी व सादरीकरणानुसार निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी नाव,पत्ता, सादर केलेला प्रकार पुढीलप्रमाणे आहे.

श्यामराव कोंडीबा नारळे, टाकळी (निलवर्ण) ता. परभणी -अभंग, मनमथप्पा नागनाथप्पा खाके, चारठाणा ता. जिंतूर-भजन, शांतीलाल छबिलदास धुमाळ, खानपूर नगर, पिंगळी रोड, परभणी-किर्तन, ढवळे महादेव शेषराव,रायपूर, हातणूर, ता. सेलू- किर्तन/कबीर, कमलाजी किशनराव कवळे, अंबाभवानी नगर -स्वच्छता गीत, विठ्ठल दौलतराव कांबळे, देवळा पुनर्वसन वाकी-बॅन्ड, सदाशिव पुंजाजी बेले गादाडगव्हाण वाडी ता. जिंतूर-वादक, दिलीप बाळिराम बनकर,





*संवेदनशील अभिनेते आणि दिग्दर्शक गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाने मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले, मुंबई येथे आज सांगितिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. मानवी मनाचे कांगोरे हाताळणारे दिग्दर्शक म्हणून अभिनेता गुरुदत्त यांची ओळख होती, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य ॲड. आशिष शेलार यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते किशोर कदम व नाट्यनिर्माते प्रसाद कांबळी उपस्थित होते. या कार्यक्रमात ख्यातनाम गायक-गायिका सरिता राजेश, सौम्या वर्मा, सर्वेश मिश्रा, ओंकार देवासकर, अमित काकडे, रिधीमा लाड आदी कलाकार सहभागी होते. रसिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला.*

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना प्रशासनाचा 'एक हात मदतीचा' खचून जाऊ नका, प्रशासन, समाज तुमच्या सोबत: जिल्हाधिकारी स्वामी

**छ. संभाजीनगर। प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आज दिवाळी सणाच्या पार्श्वभुमिवर जिल्हा प्रशासनाने 'एक हात मदतीचा' दिला. दिवाळ सणासाठी लागणाऱ्या वाण सामानाचे किट देण्यात आले. शेतकरी आत्महत्येसारख्या दुर्दैवी प्रसंगाला आपण सामोरे जात असतांना खचून जाऊ नका, प्रशासन, समाज तुमच्या सोबत आहे, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी उपस्थित शेतकरी कुटुंबियांना दिला. जिल्हाधिकारी कार्यातील नियोजन सभागृहामध्ये आज 'एक हात मदतीचा' या उपक्रमांतर्गत पैठण फुलंब्री आणि छत्रपती संभाजी नगर या तीन तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यात आली. फराळ किट आणि किराणा साहित्य, रब्बी हंगामासाठी बियाणे किट वाटप करण्यात आले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे मनसुख झांबड, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, पैठण फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, पैठण तहसीलदार ज्योती पवार, फुलंब्री तहसीलदार योगिता खटावकर, तसेच पैठण, फुलंब्री आणि छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शेतकरी कुटुंबीय या



कार्यक्रमास उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, संकटात खचून न जाता त्यांच्या दुःखात जिल्हा प्रशासन आणि इतर नागरिक, संस्था मदतीला आहेत हा विश्वास या कार्यक्रमातून द्यावयाचा आहे,असे त्यांनी सांगितले.

या मदतीत आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना शासन निर्णयानुसार देय मदत, तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना या सारख्या सामाजिक लाभाच्या योजनांचा लाभ तसेच सामाजिक संस्थांच्या व प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपले योगदान देऊन ही मदत वाटप करण्यात आली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले.

२६७ कुटुंबांना मदतीचा हात- जिल्ह्यातील एकूण २६७ जणांना ही मदत देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे, छत्रपती संभाजीनगर, पैठण, फुलंब्री आणि सिल्लोड येथे सिल्लोड, सोयगाव तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबियांना मदत देण्यात आली.

उद्या शुक्रवार दि. १७ रोजी सकाळी १० वा. कन्नड येथे कन्नड, खुलताबाद तालुक्यातील व दुपारी ३ वा. लासूर स्टेशन येथे वैजापूर, गंगापूर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबियांना मदत देण्यात येईल.

असा राबविला उपक्रम- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे सर्वेक्षण जिल्हा प्रशासनाने सेवा पंधरवाड्यानिमित्त तालुकास्तरावर केले. या सर्वेक्षणातून मदतीची गरज असणाऱ्या शेतकरी कुटुंबांची निवड करण्यात आली. शासकीय योजनेच्या लाभाबरोबरच जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करुन एक किट तयार करण्यात आले आहे. जिल्ह्यात एकूण २६७ कुटुंबियांना मदत केली जाणार आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यामध्ये ३९,शेतकरी कुटुंब, फुलंब्रीमध्ये ३० पैठण तालुक्याचे ४० सिल्लोड येथील ६२ सोयगाव येथील १२ कन्नड येथील ३६ खुलताबाद येथील ४ शेतकरी आणि वैजापूर येथील १० गंगापूर येथील ३४ तसेच इतर उर्वरित सदस्य यांना मदत करण्यात येणार आहे.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### दीपावली निमित्त आष्टी बाजारपेठेत गर्दी



**आष्टी ।** प्रतिनिधी

मागच्या काही दिवसापूर्वी आष्टी तालुक्यातील जवळपास बहुतांशी भागात अतिवृष्टी झाल्याने फार मोठी पुर परिस्थिती निर्माण झाली होती यामुळे हाता तोंडाशी आलेले पीक अक्षरशः धना सहीत वाहुन गेले काहींच्या जमिनी देखील वाहून गेल्या अशा परिस्थितीमध्ये शेतकरी यंदा हवां दिन झाला सरकारने नुकसान भरपाई चे पैसे शुक्रवार मध्यरात्रीपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवण्यास सुरुवात केली असून नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे मदत जरी तुटपुंजी असली तरी मूर्तीला काडीचा आधार अशा पद्धतीने आज आष्टी शहरातील बाजारपेठेमध्ये कपड्याची दुकाने स्टेशनरी दुकानांमध्ये किराणा दुकानांमध्ये गर्दी दिसून आली छत्रपती शिवाजी महाराज चौक शनी चौक या दोन्ही चौकामध्ये कपड्याची दुकाने किराणा दुकाने तसेच आकाश कंदील दिवा लावण्यासाठी पण ती महालक्ष्मीची मूर्ती व इतर काही शोभेच्या वस्तू घेण्यासाठी नागरिकांनी आज गर्दी केली होती.

### केजमध्ये दोन अपघातात दोन ठार

**केज ।** प्रतिनिधी

तालुक्यातील नामेवाडी येथे शनिवारी (दि. १८) दुपारीं साडे तीन वाजण्याच्या एका ट्रॅक्टरने दुचाकीला धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील शालेय विध्यार्थी जागीच ठार झाला तर त्याच्या मामाच्या दोन्हीही पायावरून ट्रॅक्टरचे टायर जाऊन गंभीर जखमी झालेल्या मामाला अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. केज तालुक्यातील नामेवाडी येथील सचिन महादेव वायबसे या शेतकऱ्याने साखर कारखान्याला ऊसतोडणीसाठी ट्रॅक्टर लावण्यासाठी शुक्रवारी नवीन ट्रॅक्टर खरेदी करून नामेवाडीत आणला होता. दरम्यान शनिवारी दुपारीं सचिन वायबसे यांनी शिंधी फाट्यावरील ढाब्यावर दारू पिवून ते ट्रॅक्टर चालवीत नामेवाडीकडे जात आसताना दुपारीं साडेतीन वाजण्याच्या दरम्यान घाटेवाडीला जाणाऱ्या रस्त्याजवळ समोरून दुचाकीवर येणाऱ्या मामा, भाच्याच्या दुचाकीला जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात शालेय विध्यार्थी गणेश अशोक वायबसे वय १५ वर्षे रा नामेवाडी हा जागीच ठार झाला. तर त्याचे मामा विठ्ठल रामदास आंधळे रा. आंधळेवाडी यांच्या पायावरून ट्रॅक्टरचे समोरचे टायर गेल्यामुळे त्यांचे दोन्हीही पाय निकामी झाले आहेत. दरम्यान रुग्णवाहिकेतून जखमी विठ्ठल रामदास आंधळे यांना अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ सुरज हजारे यांनी दिली.

### माजी नगरसेवक सईद बीन मोहम्मद चाऊस यांचे निधन

**बीड ।** प्रतिनिधी

बीड शहरातील बालेपीर भागातील रहिवासी असलेले व याच भागाचे माजी नगरसेवक सईद बीन मोहम्मद चाऊस यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे यांचा दफनविधी आज दुपारी जोहर च्या नमाज नंतर म्हणजे २ वाजता बालेपीर दर्गा येथील कब्रस्तानात करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली,६ बहीण व ८ भाऊ असा मोठा परिवार आहे .

# नाम फाउंडेशन तर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देणार



## कुर्ला येथे ॲड. अजित देशमुख यांच्या हस्ते बियाणे वाटप

**बीड ।** प्रतिनिधी

पूरग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन यांच्यातर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. आज कुर्ला येथील २०० शेतकऱ्यांना या बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड .अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. सिने अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनने सामाजिक उद्दिष्ट समोर ठेवून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला आहे. एक हजार शेतकऱ्यांना प्रत्येकी तीस किलो हरभऱ्याचे बी आणि आठ किलो ज्वारीचे बी देण्यात येणार आहे. कुर्ला येथे अतिवृष्टीसह मोठ्या पुराच्या पाण्यात लोक देखील अडकले होते. शेतीचे या ठिकाणी मोठे नुकसान झालेले आहे. पुरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाची स्वतंत्र टीम बाहेरून मागवण्यात आली होती. त्यामुळे या शेतकऱ्यांना मदतीची आवश्यकता होती. स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव तुषार पाटील यांच्यासह रत्नाकर मार्कड घोडके सर, गोवर्धन मस्के आणि इतरांनी या कामी पुढाकार घेतला. आज या ठिकाणच्या दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात ▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या बार्शी व तेलगाव नाका परिसरात दीपावली निमित्त फ़राळ, कपडे वाटप: सीमा ओस्तवाल

**बीड ।** प्रतिनिधी

बार्शी व तेलगाव नाका परिसरात दीपावली निमित्त गरीब कुटुंबाना फ़राळ, कपडे वाटप गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाऊंडेशनतर्फे सीमा ओस्तवाल यांनी गेल्या काही दिवसापासून गरिबांना किराणा किट, कपडे, फ़राळ वाटप करतात. यामुळे अनेक गरीब कुटुंबानाची दीपावली गोड बनती. त्यांचा आनंद गगनात मावेना. गरीब हल्लीखीच्या जीवनात कुटुंब चालवीने खूप अवघड आहे. त्यात खऱ्या अर्थाने दीपावली साजरी क रायची असल्यास पाच हजार रुपयांचा किराणा सामान लागते तेही कामित कमी. खूप तारेवरची कसरत करावी लागते. अशा वेळी



सीमा ताईची साथ व सहकार्य खूप मोलांचे वाटते अशी प्रतिक्रिया अनेक कुटुंबातील महिलांनी दिली. यावेळी पत्रकार भागवत वैद्य, तक्षशिला सोनावणे, सविता जैन आदी कार्यकर्ते उपस्तित होते.



*ओबीसी कुणबी व्हॅलिडीटी व एलएलबी साठी कुणबी मधून प्रथम वर्षासाठी प्रवेश मिळाला ते फक्त दादा मुळे त्याबद्दल आपले संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचा सत्कार करताना रोहन काळे व त्यांचे कुटुंब दादांचा सत्कार करताना व त्यांचा कायम ऋणी राहील धन्यवाद दादा आमचे सर्व कुटुंब आपल्या आभारी आहे.*

## पिंपळनेर हद्दीत चोरट्यांचा धुमाकूळ;दोन ठिकाणी चोरी
## पिंपळनेर पोलिसांना एकाही घटनेचा शोध लागेना



**● अवैध दारू वाहतूक सुरू**

**पिंपळनेर परिसरातील धाबे, बिअर- बार ,देशी दारू केंद्र यातून दारू वाहतूक विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. यावर कुणाचाही अंकुश राहिलेला नाही कुठेही सहजरीत्या दारू उपलब्ध होत आहे.निवडणुकीची रणधुमाळी तोंडावर असुन पिणाऱ्याची संख्या वाढत आहे.**

**पिंपळनेर ।** प्रतिनिधी

पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंदे , चंदन तस्करी,देशीदारूची सर्रास वाहतूक आणि घरफोड्या व चोरीच्या घटना सतत घडत असून पिंपळनेर पोलिसांना अद्याप एकही घटनेचा शोध लागेना.

पिंपळनेर पासून जवळच असलेल्या ईट आणि ईटवाडी येथे दि.१८ रोजी रात्री परमेश्वर चव्हाण यांचे फाट्यावर एसबीआय ग्राहक सेवा केंद्र असून तीन चोरटे दुचाकी वर आले आणि दुकानांचे कुलूप तोडून असतील कॉम्प्युटरचा

पीसी मेटर, आणि महत्वाचे कागदपत्रे चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली तर ईटवाडी गावातील रामा चन्ने यांच्या घरी कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातून सोन्याचे झुंबर, गंठन, लहान मुलांच्या अंगठ्या व नगदी ३० हजार असा मुद्देमाल चोरी गेला असून या बाबत पिंपळनेर पोलिसांत तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी तात्काळ पंचनामा करून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.चोरटे फरार असून,सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत आहेत. पिंपळनेर पोलिसांना मात्र यापूर्वीच्या एकाही घटनेचा अद्याप शोध लागत नसल्याने सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

## तेलगाव जिल्हा परिषद गटातून देवई शिंदे यांना संधी द्या : जन माणसातून मागणी

**दिंद्रुड ।** प्रतिनिधी

आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीचे पडघम आता वाजायला सुरुवात झाली आहे. धारूर तालुक्यातील तेलगाव जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असुन नित्रुड येथील सामाजिक कार्यकर्त्या देवई शिंदे यांना महायुती च्या कोट्यातून उमेदवारीची संधी देण्याची मागणी सर्वसामान्यातून होताना दिसत आहे.

गत जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाच्या तिकिटावर दिंद्रुड जिल्हा परिषद गटातून निवडणुकीत देवई शिंदे सामोरे गेल्या होत्या. त्यावेळी अवघ्या १३८ मतांनी त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार अनुसया साळुंखे यांना ६७३१ तर देवई शिंदे यांना ६५९३ मते



या निवडणुकीत मिळाली होती. गेल्या पाच वर्षात देवई शिंदे यांनी दिंद्रुड व तेलगाव जिल्हा परिषद गटातील जनतेसाठी सक्रिय भूमिका निभावली आहे. प्रत्येकाच्या अडीअडचणीला धावून जाण्यात त्या यशस्वी ठरल्याने तेलगाव जिल्हा परिषद गटात महायुतीच्या कोट्यातून तिकीट मिळाल्यास देवई शिंदे या बहुसंख्य मताने विजयी होणार असल्याची चर्चा जोर धरत आहे .राजकीय पातळीवर देवई शिंदे यांचा उमेदवारी साठी विचार होण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. नित्रुड येथील उद्योजक व भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते शेख चांद यांचे तेलगाव जिल्हा परिषद गटात मोठे वजन असून शेख यांच्या स्वकीय असलेल्या देवई शिंदे यांना तेलगाव जिल्हा परिषद गटातील जनता विजय करण्यासाठी सरसवली असल्याने देवई शिंदे याच महायूती च्या प्रभावी उमेदवार ठरणार असल्याचे मत जनमानसात बोलले जात आहे.

# दिव्य ज्योति जागृती जाग्रति संस्थानच्या वतीने अंबाजोगाई येथे श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञाचा भूमिपूजन समारंभ संपन्न

**● दि.२५ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड येथे होणार भव्य कथा**

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी

गुरुदेव सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली, दिव्य ज्योति जाग्रती संस्थान शाखा लातूरतर्फे प्रस्तुत व दिव्य ज्योति परिवार आयोजित *संतुलन (महिला सशक्तीकरण व लिंग समानता)* या प्रकल्पांतर्गत श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रारंभी आई दुर्गा भवानी माता व सद्गुरु सर्वश्री आशुतोष जी महाराज यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. या ज्ञानयज्ञाचा भूमिपूजन समारंभ आज दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, परळी रोड, अंबाजोगाई येथे संपन्न झाला. या प्रसंगी *प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सौ. नमिताताई मुंदडा व ज्येष्ठ समाज सेवक श्री नंदकिशोरजी मुंदडा यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.





या वेळी संस्थेचे प्रचारक स्वामी चिदानंदजी, स्वामी अमोघानंद जी, स्वामी निरुपानंदजी, तसेच साध्वी अन्नपूर्णा भारतीजी व साध्वी लक्ष्मी भारतीजी उपस्थित होत्या. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून भूमिपूजन सोहळ्याला धार्मिक वातावरणात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कथाव्यास म्हणून भारत विख्यात भागवताचार्या साध्वी अदिति भारतीजी (शिष्या, सर्वश्री आशुतोष महाराजजी) आपल्या सुमधुर वाणीमधून श्रीमद् देवी भागवत महापुराणाचे रसाळ कथा करतील.या धार्मिक सोहळ्याचा शुभारंभ दि.२५ ते दि.३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दररोज सायंकाळी ३.०० ते ७.०० या वेळेत योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, अंबाजोगाई येथे होणार आहे. कथेला प्रारंभ होण्यापूर्वी दि.२४ ऑक्टोबर रोजी भव्य कलश यात्रा काढण्यात येणार आहे. ही यात्रा योगेश्वरी देवी मंदिर, अंबाजोगाई येथून सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, मीनाताई ठाकरे चौक, मोंढा मार्गे बसस्टँड असा मार्गक्रमण करून कथेच्या ठिकाणी पोहोचेल. या कलश यात्रेत ५०० महिला कलश घेऊन सहभागी होतील. देवीची विशाल प्रतिमा असलेला रथ, सद्गुरु सर्वश्री आशुतोष महाराजजींच्या प्रतिमेचा शोभायात्रा रथ, तसेच विविध धार्मिक देखावे या यात्रेचे वैशिष्ट्य ठरणार आहेत.

संस्थेच्या संतुलन प्रकल्पाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरण व लिंग समानतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या ज्ञानयज्ञाचा हेतू आहे. दिव्य ज्योति जाग्रति संस्थान अध्यात्माच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे कार्य करत असून, या कथेच्या माध्यमातून भक्तांना देवीच्या अखंड भक्तीशी जोडण्याचा व जीवन कल्याणाचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.